नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/09/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. मौदा – अतर्गत ०७ कि.मी अंतरावरील मौजा सिंगोरी येथे दिनांक ०५/०९/२०२३ चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. भागोबाई सखाराम गंगोबोईर, वय ४७ वर्ष, रा. सिंगोरी ता. मौदा जि. नागपूर यांचा मुलगा जखमी नामे– लक्ष्मीनारायण गंगोबोइर हा घराजवळील गल्ली झाडत असता आरोपी नामे रोहीत चंद्रवंशी वय ४८ वर्ष, रा सिंगोरी ता. मौदा जि. नागपुर हा तिथे आला गल्ली साफ सफाई करतांना पाहून म्हणु लागला की, ही गल्ली माझा मालकीची आहे असे म्हणून फिर्यादीच्या मुलासोबत झगडा भांडण करू लागला व तुमची एकदाची किरकिर मिटवुन टाकतो आज तुला खतम करून टाकतो असे म्हणुन त्याचे घरी जावुन लोखंडी पावड़ा मेवुन आला व डोक्यावर मारून त्याला गंभीर जखमी केले व जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो स्टे मौदा येथे आरोपीविरुद्ध कलम ३०७ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक भुते मो. नं. ९८२२५६६१८० या करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. बेला :– अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा शेडेश्वर शिवार येथे दिनांक ०३/०९/२०२३ चे ०४.०० वा. ते ०४.३० वा. दरम्यान यातील मृतक नामे– सौ. विदया लक्ष्मण शेन्डे, वय ४५ वर्ष, रा. बेलपेठ शेडेश्वर ता. उमरेड जि. नागपुर हि शेतात काम करित असतांना अचानक वातावरण बिघडल्याने विजेचा कडकडाट सह पाउस सुरू झाल्याने मृतक हिच्या अंगावर विज अचानक पडल्याने डोक्याच्या मागील बाजुचे केस व उजव्या साईडचे कमरेचा भाग विज पडल्याने काळपट पडले व अंगावरिल साडी व सलवारच्या खालचा पायजामा हा पन जळलेला होता. मृतक हि विज पडुन जागीच मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गजानन रामकृष्ण शेंडे, वय ४७ वर्ष रा. बेलपेठ भोडेश्वर ता. उमरेड जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बेला येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनी /अजित कदम मो. नं. ९११२९८५९२२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा :**— अंतर्गत भवानी हॉस्पीटल पारडी नागपूर येथे दिनांक ०४/०९/२०२३ चे १२.३० वा. दरम्यान यातील मृतक नामे— राजू कृष्णाजी वानखेडे, वय ४२ वर्ष, रा. टेमसना जि. नागपूर हा नाग नदीच्या किनाऱ्यावर मोटार पंप बसविलेला असून मोटार पंपच्या साहायाने धानाच्या शेताला पाणी देत असता मोटार पंप चालू करण्याकरीता शेतात गेला असता त्याला मोटार पंपला असलेला ईलेक्टीक करंट लागून मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा गौतम मेश्राम ब. नं. १६९ मो. नं. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**